महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय, पुणे
( स्वायत्त ) ( ISO 9001:2015 ) ( ISO/IEC – 27001:2013)
४१२/ब, मंडळाची इमारत, चौथा मजला, बहिरट पाटील चौक,
मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६
Email :rbtepn@msbte.com दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६९९४ Web. www.msbte.org.in

जा.क्र.मरातंशिमं/विकापु/लेखा/उ.प.२०२४/672 दि. १३/०६/२०२४

प्रति,

प्राचार्य,
सर्व MSBTE संलग्नीत संस्था

विषय :- उन्हाळी परीक्षा २०२४ च्या देयकांबाबत.
संदर्भ :- मंडळाचे पत्र क्र. मरातंशिमं/का-१०/मानधन/२०२४/४१ दि. ०४ जून २०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी परीक्षा २०२४ चे परीक्षा वितरण केंद्र, थेअरी, गुणमुल्यांकन व परीक्षेची इतर देयके ही ऑनलाईन पध्दतीने दि. २०/०६/२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत. त्यानंतर Online Link उपलब्ध करून दिली जाणार नाही याची सर्व संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी. तसेच सदर देयके अंतिमरित्या Confirm व Submit करणेपूर्वी खालील दिलेले प्रमाणपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरीने या वेबसाईटवर Upload करावे. जी संस्था प्रमाणपत्र (Cerificate) Upload करणार नाही अशा संस्थेची देयके या कार्यालयाकडून पारित केली जाणार नाहीत व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच प्रमाणपत्राची प्रत (Hard-copy) पोस्टाने पाठवून द्यावी. सदर परिपत्रकाचे अवलोकन करण्यात यावे.

तसेच संदर्भिय कार्यालयीन आदेशान्वये परीक्षेच्या कामाचे मानधनामध्ये वाढ करण्यात आलेली असून बीलपोर्टलमध्ये सुधारीत दर नमूद करण्यात आलेले आहेत. सदरची वाढ ही दि. ०२/०५/२०२४ पासून लागू करण्यात येत आहे. त्यामुळे आपण बीलपोर्टल मध्ये जी देयके यापूर्वी भरून Confirm केलेली असतील त्यांचे Confirmation काढून देण्यात आलेले आहे. प्रात्यक्षिक देयकांव्यतिरिक्त सर्व देयके (DC, Theory, RAC, Vigilance Squad) नव्याने सुधारीत करून भरण्यात यावी.

13/06/2024

(शाहीद उस्मानी)
उपसचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय, पुणे

---

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की संस्था क्र. ... संस्थेचे नाव ... उन्हाळी परीक्षा २०२४ परीक्षेची देयके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र. मरातंशिमं/का-१०/मानधन/२०२४/४१ दि. ०४ जून २०२४ अन्वये तयार केली असून ती मंडळाच्या नियमाप्रमाणे बरोबर आहेत. उन्हाळी परीक्षा २०२४ संबंधित पूर्ण देयक याप्रमाणे विहित मुदतीत सादर करीत असून Online देयके सादर केल्यानंतर या विषयाच्या देयकांची पुर्नमागणी करणार नाही.

तसेच मंडळाच्या नियमाप्रमाणे पारीत केलेली देयके आमच्या संस्थेस मान्य राहतील त्याकरीता प्रमाणपत्र लिहून देत आहे.

प्राचार्य